**ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचे स्त्रोत निश्चितीचे दाखले जिल्हा परिषदेतील भूवैज्ञानिकांनी देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक :ग्रापापु-१००१/ प्र.क्र. ३१० / पापु- ०७**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ जुलै, २००१**

**पहा:-** शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. ग्रापापु १०००/ प्र.क्र. १०७ पापु-०७, दिनांक १४ नोव्हेंबर, २०००

**शासन परिपत्रकः**

राज्य शासनाकडील योजना जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत करण्याच्या निर्णयानुसार रु.७५ लाखापर्यंतच्या ग्रामीण पाणी पुरवठा योजना राबविण्याची जबाबदारी जिल्हा परिषदांवर सोपविण्यात आलेली आहे. तसेच भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडील विंधण विहीरींचा कार्यक्रमही जिल्हा परिषदांकडे राबविण्यासाठी सोपविण्यात आले आहे. हे कार्यक्रम राबविण्यासाठी आवश्यक कर्मचारीवृंद तसेच नळ योजनांसाठी व विंधण विहीरींसाठी उद्‌भव सुचविण्याकरीता भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेकडील १ सहाय्यक भूवैज्ञानिक व २ कनिष्ठ भूवैज्ञानिकांच्या सेवा जिल्हा परिषदांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

२. नळ योजनांचे व विंधण विहीरीचे दाखले प्रमाणित करण्याचे अधिकार जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिकांस असल्याने जिल्हा परिषदांमध्ये पदस्थापित केलेले सहाय्यक भूवैज्ञानिक हे दाखले प्रमाणित करीत नाहीत. अशा तक्रारी आल्या आहेत. सध्या हे दाखले जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिकांडून प्रमाणित करुन घेण्यात येतात. यामध्ये वेळेचा अपव्यय होतो व शासनाने ज्या उद्देशाने विकेंद्रिकरण केले आहे तो उद्देश सफल होत नाही.

३. या सर्व बाबींचा विचार करुन शासन अश्या सूचना देत आहे की, जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत असलेल्या भूवैज्ञानिक संवर्गातील ज्येष्ठ अधिका-यांने तपासणीअंती स्त्रोत निश्चितीचे प्रमाणपत्र स्वाक्षरी करुन एखाद्या प्रकरणी आणखी तांत्रिक मार्गदर्शन आवश्यक वाटल्यास ते संबंधीत जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिकांकडून घेता येईल.



899

४. तसेच सर्वेक्षण उपकरणे/साधने व तांत्रिक तपशिलही जिल्हा कार्यालयाकंडून घेता येईल. तथापि यासाठी संबंधित भूवैज्ञानिकाने कागदोपत्री व्यवहार करत न बसता वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यालयात प्रत्यक्ष जाऊन याबाबी उपलब्ध करुन घेण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(सुधीर ठाकरे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सदस्य सचिव (तांत्रिक ) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
सदस्य सचिव (प्रशासन) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा पुणे-३७
प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा , (सर्व)
प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधीक्षक अभियंता , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
वरिष्ठ - भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, (सर्व)
कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
उप अभियंता पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व सर्व कार्यासन अधिकारी
ग्राम विकास व जलसंधारण विभाग कार्यासन क्र. १९,२३,२५,२७
निवड नस्ती कार्यासन क्र.पापु-०७ पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग